# कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला
कल्याण- शिळ रोड कल्याण (प) जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ **e mail :- apmckalyan@rediffmail.com**

## <u>नोकरभरतीची विस्तृत जाहिरात</u>

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेली १२ विविध पदांची ३७ रिक्त पदे सरळसेवा पद्धतीने भरणेसाठी दि. १५/०३/२०२४ रोजीच्या दै. लोकमत व दै. जनतेचे जनमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरणेकरीता कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीस निवडसुची तयार करावयाची आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात केवळ ऑनलाईन पद्धतीने बाजार समितीच्या **http://apmckalyan.org किंवा http://kalyanapmc.com** संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

- उमेदवारांना परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये वेतनश्रेणीत नमुद केल्यानुसार दरमहा वेतन अदा करणेत येईल.

टिप – १)सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होणेचा संभव आहे व याबद्दल उमेदवाराची कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. हे अधिकार बाजार समितीने राखुन ठेवलेले आहेत.

२)परीक्षेसाठी भरलेले शुल्क ना परतावा (Non Refundable) राहील.

३)उमेदवाराने अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच सादर करावयाचे आहेत.

४)उमेदवाराने खाली नमुद केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव दि. १५/०३/२०२४ या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

# नामनिर्देशनाने भरावयाची पदे दर्शविणारे विवरणपत्र

**१) पदाचे नांव – उपअभियंता (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (९३००-३४८०० ग्रेड पे ४८००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू. ४९,७२२/-

शिक्षण – बी.ई. (सिव्हिल) किंवा डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअरींग किंवा तत्सम परिक्षा द्वितीय श्रेणीत पास

अनुभव – शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी संस्थेत बी.ई. सिव्हिल असलेल्या उमेदवाराला अनुभवाची मर्यादा २ वर्ष राहील. त्यास प्राधान्य देण्यात येईल.

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**२) पदाचे नांव – शाखा अभियंता (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (९३००-३४८०० ग्रेड पे ४४००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू. ४८,३५४/-

शिक्षण – बी.ई. (सिव्हिल) किंवा डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअरींग किंवा तत्सम परिक्षा पास

अनुभव – शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी संस्थेत किमान १ वर्षाचा अनुभव

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**३) पदाचे नांव – कनिष्ठ अभियंता (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (९३००-३४८०० ग्रेड पे ४३००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू. ४७,२१२/-

शिक्षण – डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरींग तसेच

अनुभव – तत्सम कामाचा ४ वर्षाचा अनुभव

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**४) पदाचे नांव – निरिक्षक (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (९३००-३४८०० ग्रेड पे ४२००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू. ४६,८७०/-

शिक्षण – संविधीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. तसेच संबंधित पदाचे कामकाजाकरीता आवश्यक असणारे मान्यता प्राप्त संस्थेकडून मिळालेले संगणकीय / व्यवसायिक / तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र.

अनुभव – तत्सम कामाचा २ वर्षाचा अनुभव

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **भरावयाची पदे** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | **सर्व साधारण** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **माहिला** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **खेळाडु** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **माजी सैनिक** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **पदवीधर अंशकालीन** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **प्रकल्पग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **भुकंप ग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **दिव्यांग** | ० | | | | | | | | | | |
| | **अनाथ** | ० | | | | | | | | | | |

**५) पदाचे नांव – सुपरवायझर (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (५२००-२०२०० ग्रेड पे २४००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२६,६९२/-

शिक्षण – संविधीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. तसेच संबंधित पदाचे कामकाजाकरीता आवश्यक असणारे मान्यता प्राप्त संस्थेकडून मिळालेले संगणकीय / व्यवसायिक / तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र.

अनुभव – तत्सम कामाचा १ वर्षाचा अनुभव

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**६) पदाचे नांव – वरिष्ठ लिपीक (एकुण पदे – ०१)**

वेतनश्रेणी – (५२००-२०२०० ग्रेड पे २४००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२६,६९२/-

शिक्षण – संविधीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. तसेच संबंधित पदाचे कामकाजाकरीता आवश्यक असणारे मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेले संगणकीय / व्यवसायिक / तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र.

अनुभव – तत्सम कामाचा १ वर्षाचा अनुभव

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**७) पदाचे नांव – कनिष्ठ लिपिक (एकुण पदे – ६)**

वेतनश्रेणी – (५२००-२०२०० ग्रेड पे १९००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२४,८२२/-

शिक्षण – संविधीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. तसेच संबंधित पदाचे कामकाजाकरीता आवश्यक असणारे मान्यता प्राप्त संस्थेकडून मिळालेले संगणकीय / व्यवसायिक / तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र.

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ६ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ५ |
| | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**८) पदाचे नांव – वाहन चालक (एकुण पदे – ५)**

वेतनश्रेणी – (५२००-२०२०० ग्रेड पे १९००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२४,८२२/-

शिक्षण – एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा पास व मोटार कार ड्रायव्हिंग लायसन्स

अनुभव - बृहन्मुंबईत मोटार चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ५ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**९) पदाचे नांव – शिपाई (एकुण पदे – ८)**

वेतनश्रेणी – (४४४०-७४४० ग्रेड पे १३००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२०,३२१/-

शिक्षण – एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा पास

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | २ | ० | ८ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ६ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | १ (दृष्टी विकलांग) सदर उमेदवार न मिळाल्यास इतर प्रकारचा दिव्यांग उमेदवार | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**१०)  पदाचे नांव – वॉचमन (एकुण पदे – ७)**

वेतनश्रेणी – (४४४०-७४४० ग्रेड पे १३००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२०,३२१/-

शिक्षण – एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा पास

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **भरावयाची पदे** | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ७ |
| समांतर आरक्षण | **सर्व साधारण** | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ६ |
| | **माहिला** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **खेळाडु** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **माजी सैनिक** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **पदवीधर अंशकालीन** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **प्रकल्पग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **भुकंप ग्रस्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **दिव्यांग** | १ (हाता/पायाने अपंग) सदर उमेदवार न मिळाल्यास इतर प्रकारचा दिव्यांग उमेदवार | | | | | | | | | | |
| | **अनाथ** | ० | | | | | | | | | | |

**११)  पदाचे नांव – साफसफाई कामगार (एकुण पदे – ४)**

वेतनश्रेणी – (४४४०-७४४० ग्रेड पे १३००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२०,३२१/-

शिक्षण – एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा पास

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

**१२) पदाचे नांव – माळी (एकुण पदे – १)**

वेतनश्रेणी – (४४४०-७४४० ग्रेड पे १३००) सहाव्या वेतन आयोगानुसार - एकत्रित वेतन सुमारे रू.२०,३२१/-

शिक्षण – एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षा पास

वयोमर्यादा – १८ वर्षापेक्षा कमी व ३८ पेक्षा अधीक असणार नाही.

| अ. क्र. | तपशील | अ. जा. | अ. ज | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| समांतर आरक्षण | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माहिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंप ग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| | अनाथ | ० | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| १. | **(अ) वयोमर्यादा पुढील बाबतीत ५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.**<br>१. मागासवर्गीय उमेदवार तसेच अंध, अपंग (दिव्यांग) उमेदवार.<br>२. माजी सैनिक.<br><br>**(ब) पुढील बाबतीत उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.**<br>१. ज्या उमेदवारांचे बाजार समितीत किंवा एखाद्या संघटनेत तीन वर्ष अखंड सेवा केली असेल असा उमेदवार.<br>२. मा. पणन संचालकांनी मान्यता व मंजुरी दिलेले प्रशिक्षण घेतलेले उमेदवार.<br>३. अतिउच्च अर्हता असलेले व बाजार समितीच्या किंवा सहकारी चळवळीच्या कामकाजात अनन्यसाधारण असलेला उमेदवार. |
| २. | **परिविक्षाधीन कालावधी – (Probation Period)**<br>निवड करण्यात आलेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन (हंगामी) कालावधी ६ महिन्याचा राहील. |

| | |
|---|---|
| ३. | **निवड कार्यपद्धती – ऑनलाईन परीक्षा –**<br>१. वरिष्ठ पदांकरीता (उपअभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, निरिक्षक, सुपरवायझर, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक) मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही. त्यांचेसाठी २०० गुणांची लेखी परीक्षा (ऑनलाईन) घेण्यात येईल. ज्या पदांसाठी लेखी परीक्षा व व्यवसायिक चाचणी घेणे आवश्यक असेल अशा पदांसाठी १२० गुणांची लेखी परीक्षा (ऑनलाईन) व ८० गुणांची व्यवसायिक चाचणी अशा पध्दतीने परीक्षा घेण्यात येईल.<br>२. ज्या पदांकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे, अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित या विषयांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकुण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.<br>३. ज्या पदांकरीता पदवी ही कमीत कमी अहर्ता आहे अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) समान राहील.<br>४. ज्या परीक्षांसाठी फक्त लेखी परीक्षा घेऊन निवड करायची आहे अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेऊन निवड करण्यात येईल. निवड होणा-या उमेदवारांना संबंधित जिल्ह्याचा (ठाणे) भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थानिक बाबींची माहीती असणे आवश्यक आहे. यास्तव सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नपत्रिका तयार करताना सदर बाब विचारात घेण्यात येईल. वरील परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण ठेवण्यात येतील. |
| ४. | **कागदपत्र पडताळणी –**<br>उमेदवारास परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बाजार समितीच्या धोरणाप्रमाणे आवश्यकता भासल्यास शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये ऑनलाईन परिक्षेद्वारे पात्र होणा-या उमेदवारास बाजार समितीचे धोरणाप्रमाणे मुलाखतीस (आवश्यकतचा भासल्यास) बोलविले जाईल. या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस पात्र राहणार नाही. मुलाखतपत्र (आवश्यकता भासल्यास) ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. मुलाखतपत्र (आवश्यकता भासल्यास) **http://apmckalyan.org किंवा http://kalyanapmc.com** या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावे. मुलाखतपत्र (आवश्यकता भासल्यास) डाऊनलोड करण्यास काही अडचण निर्माण झाल्यास support@kalyanapmc.com या ईमेलद्वारे व +९१ ९२७०१९४८०६ या हेल्पलाईनवर संपर्क करावा. |
| ५. | **मुलाखत (आवश्यकता भासल्यास)** – ऑनलाईन परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना बाजार समितीचे धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात ऑनलाईन परिक्षेचे गुणानुक्रमे १० गुणांसाठी मुलाखतीस (आवश्यकता भासल्यास) बोलाविण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहणार नाही. |

| | |
|---|---|
| ६. | **उमेदवारांची अंतिम निवड सुची** – निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत (आवश्यकता भासल्यास) गुणांची (+) अधिक ऑनलाईन परिक्षेतील गुण असे एकुण २०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतीम निवड सुची व प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल. अंतिम निवड यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना परिक्षाविधीन कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येईल. |
| ७. | **पदांच्या निवडीसाठीची कार्यपद्धती, अटी व शर्ती** –<br>ऑनलाईन परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरूपात यादी जाहिर करण्यात येतील. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिद्ध होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता (मुलाखत आवश्यकता भासल्यास) करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली महिती व मुळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकते. |
| ८. | **सर्वसाधारण अटी-**<br>१) उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ठाणे, मुंबई किंवा आसपासच्या जिल्ह्यातील केंद्रावर घेण्यात येईल. परीक्षा आवश्यकतेनुसार एका दिवसात, एक किंवा एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.<br>२) उमेदवारास इंग्रजी व मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शारिरीक क्षेमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>४) उमेदवारास कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीचे आदेशास अधिन राहून बाजार समितीच्या आस्थापनेवर नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १० दिवसाचे आत रूजू होणे आवश्यक राहील.<br>५) निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सहा महिन्याकरीता परिविक्षाधीन (Probation) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीत उपरोक्तप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीनिहाय दरमहा नियमित वेतन देण्यात येईल.<br>६) नियुक्तीपुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला तसेच आवश्यक ती मुळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. त्यामुळे दिलेली नियुक्ती रद्द करणेत येईल.<br>७) शासकीय नोकरभरतीला लागू असणारे सर्व नियम या भरतीला लागू असतील.<br>८) विवाहीत स्त्रीयांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्या संबंधीची अधिसुचित राजपत्र यांच्या मुळ किंवा सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. |
| ९ | **ऑनलाईन अर्ज व लेखी परीक्षा शुल्क भरण्याची पद्धत** –<br>१) प्रस्तुत पदांकरीता फक्त बाजार समितीच्या अधिकृत **http://apmckalyan.org किंवा http://kalyanapmc.com** या संकेतस्थळावर विहित ऑनलाईन पद्धतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन |

अर्जात नोंदविलेला ई मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बाजार समिती जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थलाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) पात्र उमेदवाराला ऑनलाईन (Online) अर्ज बाजार समितीच्या **http://apmckalyan.org किंवा http://kalyanapmc.com** या वेबसाईटद्वारे दि. २०/०३/२०२४ ते ०२/०४/२०२४ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पद्धतीने स्विकारण्यात येणारे असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र/पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रते बाबत खोट्या माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करणेत येईल.

४) ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रृटी राहिल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा वैगरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

५) उमेदवाराची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणताही कागदपत्रे पुर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनंतर गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणीकरिता पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बाजार समितीने राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

६) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना बाजार समितीच्या **http://apmckalyan.org किंवा http://kalyanapmc.com**. या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दि. ०२/०४/२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध आहे.

७) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन शुल्क भरण्याचा कालावधी दि.२०/०३/२०२४ ते ०२/०४/२०२४ रोजी पर्यंत **सायं. ५.००** वाजेपर्यंत राहील

८) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने फोटो व स्वतःची स्वाक्षरीची साईज २ MB असावी. (त्यापेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही. फोटो व स्वाक्षरी JPG/PNG या फॉर्मेट मध्ये असावी. आधारकार्ड PDF/JPG/PNG या फॉर्मेटमध्ये अपलोड करावेत.

९) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम दि. ०२/०४/२०२४ रोजी पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. नंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची लिंक बंद केली जाईल.

| | |
|---|---|
| | १०) उमेदवाराने सर्वप्रथम संकेतस्थळावरील विस्तृत माहिती व सुचना वाचून घ्याव्यात. त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लिक (Click) करावे आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा.<br>११) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरून विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रूपरेषा / वेळापत्रक /परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.<br>१२) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी महिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याचा विरूद्ध कायदेशिर कारवाई करण्यात येईल.<br>१३) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगोदर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व बाजार समितीची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.<br>१४) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.<br>१५) ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस/तोंडी परिक्षेस बोलविलेल्या अर्जादारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.<br>१६) भरती प्रक्रिया /परिक्षा स्थगित करणे/ पुढे ढकलणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदाच्या एकुण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बाजार समितीस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बाजार समितीस राहील. याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.<br>१७) ऑनलाईन परीक्षा, कागदपत्रे, छाननी इ. करीता प्रवेशपत्र (हॉल तिकीट), कार्यक्रम, विविध सुचना या केवळ संकेतस्थळावरूनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. |
| १०. | **परीक्षा शुल्क-**<br>*वरिष्ठ पदांकरीता परिक्षा शुल्क रू. १,००० + १८० (१८% जी.एस.टी)<br>*कनिष्ठ पदांकरीता परिक्षा शुल्क रू. ९०० + १६२ (१८% जी.एस.टी)<br>*मागासवर्गीय वरिष्ठ पदांकरीता परिक्षा शुल्क रू. ८०० + १४४ (१८% जी.एस.टी)<br>*मागासवर्गीय कनिष्ठ पदाकरीता परिक्षा शुल्क रू. ७०० + १२६ (१८% जी.एस.टी)<br>सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा (Non Refundable) राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ११. | विशेष सुचना -<br>१) या परिक्षेत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतेही कागदपत्रे सादर करावयाची नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत. ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बाजार समितीच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान बाजार समितीच्या स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणारी माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.<br>२) अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी support@kalyanapmc.com या ईमेलद्वारे व +९१ ९२७०१९४८०६ या हेल्पलाईन क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा. |

ठिकाण – कल्याण
दिनांक - १५/०३/२०२४

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण जि.ठाणे

प्र.सचिव सभापती

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण
जि. ठाणे